माहितीचा अधिकार

## राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ पुणे यांचे समोरील माहिती अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १८ अन्वये दाखल झालेला तक्रार अर्ज

तक्रार क्र.रामाआ /तक्रार-९९/२०१९/पुणे

राज्य माहिती आयोग, खंडपीठ पुणे,
नवीन प्रशासकीय इमारत,
विधान भवना समोर, पुणे - १

| तक्रारदार | उत्तरवादी | |
|---|---|---|
| | जन माहिती अधिकारी तथा | प्रथम अपिलीय अधिकारी तथा |
| सलीम शेख | गाव कामगार तलाठी, सजा, करवीर ता.करवीर, जि.कोल्हापूर ४१६ ००३ | तहसिलदार, तहसिल कार्यालय करवीर, ता.करवीर, जि.कोल्हापूर ४१६ ००३ |

<u>तक्रार सुनावणी दिनांक -दि.३०/११/२०२३</u>

तक्रारदार यांनी दि. १६/०४/२०१९ रोजीच्या अर्जान्वये राज्य माहिती आयोगाकडे तक्रार अर्ज दाखल केला आहे.

तक्रारदार यांनी त्यांच्या तक्रार अर्जात खालीलप्रमाणे तक्रार केलेली आहे.

"दि. २४/१२/२०१८ रोजी तलाठी, कसबा करवीर यांचेकडे हिब्बानामा फेरफाराची प्रत व संचिका मिळणेबाबत अर्ज दिला होता. सदरची माहिती मिळाली नाही अशी त्यांची तक्रार होती."

त्यानुसार आज दि.३०/११/२०२३ रोजी आयोजित सुनावणीस विद्यमान जन माहिती अधिकारी मुख्य तलाठी, करवीर श्री.विपीन उगलमुगले हे हजर होते . तसेच सहाय्यक तलाठी श्री.प्रल्हाद यादव व श्री. अमित पाडळकर हजर होते.

अपिलार्थीच्या दि. २४/१२/२०१८ च्या माहिती अर्जाला तत्कालीन सहाय्यक तलाठी श्री. प्रताप पाटील यांनी दि.११/०३/२०१९ रोजी, मागितलेली माहिती शासन परिपत्रक दि.१७/१०/२०१४ च्या आधारे नाकारली. श्री.प्रताप पाटील सध्या मयत आहेत.

विद्यमान जन माहिती अधिकारी तथा मुख्य तलाठी, ता. करवीर श्री. विपीन उगलमुगले यांनी सूचित केले की, अर्जदाराने माहिती अर्जामध्ये कोल्हापूर शहरातील प्रत्येक व्यक्तीची जी मालमत्ता होती त्याचा हिब्बानामा या दस्ताने झालेल्या फेरफाराची माहिती मागितली होती. ही माहिती त्या व्यक्तीची वैयक्तिक माहिती होती. तत्कालीन तलाठी श्री.प्रताप पाटील यांनी दि.११/०३/२०१९ रोजीच्या पत्राने मागितलेली माहिती वैयक्तिक स्वरुपाची असल्याने नाकारली.

आयोगाकडील उपलब्ध अभिलेखावरुन दिसून येते की, तक्रारदाराने माहिती अर्जामध्ये मागितलेली माहिती ही विस्तृत स्वरुपाची असून संबंधित व्यक्तींच्या वैयक्तिक मालमत्तेशी संबंधित माहिती मागितली आहे. सदरची माहिती ७/१२ बाबतच्या फेरफारासंबधीची माहिती होती.

त्यानुसार तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा सहा.तलाठी ता.करवीर यांनी कारवाई केली आहे.

सुनावणी दरम्यानचा युक्तिवाद व आयोगास सादर करण्यात आलेली कागदपत्रे विचारात घेता असे दिसून येते की, तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा सहा.तलाठी ता.करवीर यांनी कारवाई केली आहे.

उपरोक्त पार्श्वभूमिवर आयोग खालील प्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश.**

तक्रारदाराचा तक्रार निकाली काढण्यात येत आहे.

(समीर सहाय)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ पुणे

जावक क्र.तक्रार क्रमांक ९९/२०१९/पुणे/4985/2023 दिनांक 1/12/2023